जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल.cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.९८१९२०८२७९

प्रेसनोट **दिनांक २१.०२.२०२६**

सराईत गुन्हेगारांना अटक करुन एकुण ७,३९,४००/- रु. किमतीचे सोने चांदीचे दागिणे हस्तगत करून घरफोडी व वाहन चोरीचे असे एकुण ६ गुन्हे उघड केले बाबत.

ठाणे पोलीस आयुक्तालयात घरफोडी चोरीच्या होणाऱ्या घटनांना आळा घालणेसाठी मा.वरिष्ठांनी सुचना दिलेल्या होत्या, त्याप्रमाणे गुन्हे शाखेकडुन सदर घटनांना आळा घालणेसाठी उपाययोजना चालु असतानाच सदर गुन्हे उघड करण्यात गुन्हे शाखा, घटक - २, भिवंडी येथील अधिकारी व अंमलदार यांना यश प्राप्त झाले आहे.

मिळालेल्या गुप्त बातमी व तांत्रिक विश्लेषणाचे आधारे गुन्हे शाखा, घटक - २, भिवंडी येथील पथकाने सराईत गुन्हेगार/आरोपी **१)** आजाद सिंग उर्फ धनरी मधुसिंग टाक, वय ३३ वर्षे व **२)** अजय सिंग उर्फ मामू भूरासिंग दुधानी, वय २८ वर्षे, दोघे रा. दिंडोली, सुरत, राज्य गुजरात यांना शिताफीने ताब्यात घेतले. आरोपींकडे कौशल्यपुर्ण तपास करून आरोपींकडुन **एकुण ७,३९,४००/- रु. किमतीचे सोने चांदीचे दागिणे हस्तगत करून खालीलप्रमाणे घरफोडी व वाहन चोरीचे एकुण ६ गुन्हे उघड केले आहेत.**

१) नारपोली पो. ठा. गुन्हा रजि. नं. ५४/२०२६, भा.न्या.सं.क. ३०५ (अ), ३३१ (३), ३३१ (४),
२) नारपोली पो. ठा. गुन्हा रजि. नं. ३३/२०२६, भा.न्या.सं.क. ३०५, ३३१ (३), ३ (५),
३) नारपोली पो. ठा. गुन्हा रजि. नं. २४/२०२६, भा.न्या.सं.क. ३०५ (ए), ३३१ (३), ३३१ (४),
४) नारपोली पो. ठा. गुन्हा रजि. नं. १३३७/२०२५, भा.न्या.सं.क. ३३१ (४), ३३१ (३), ३०५ (ए),
५) कोनगाव पो. ठा. गुन्हा रजि. नं. ५७७/२०२५, भा.न्या.सं.क. ३०५, ३३१ (३), ३३१ (४),
६) विरार पो. ठा. गुन्हा रजि. नं. २३/२०२३, भा.न्या.सं.क. ३०३ (२).

वरील कामगिरी ही श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, ठाणे, व श्री.शेखर बागडे, सहा.पो.आयुक्त गुन्हे शोध -१, ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक - २ भिवंडीचे वपोनि श्री.शितल राऊत, सपोनि/श्रीराज माळी, सपोनि/मिथुन भोईर, पोउनि/रविंद्र बी.पाटील, पोउनि/राजेश शिंदे, पोउनि/रामचंद्र जाधव, सपोउनि/सुधाकर चौधरी, सपोउनि/सुनिल साळुंखे, पोहवा/निलेश बोरसे, प्रशांत राणे, प्रकाश पाटील, सुदेश घाग, शशिकांत यादव, साबिर शेख, राजेश गावडे, वसंत चौरे, रंगनाथ पाटील, वामन भोईर, किशोर थोरात, पोना/ योगेश कवडे, पोशि/अमोल इंगळे, सर्फराज तडवी, विजय कुंभार, भावेश घरत, चापोशि/रविंद्र साळुंखे व मपोहवा/माया डोंगरे, अनुष्का पाटील, दक्षता सुतार, मपोहवा/ सायली गंभेरा यांनी केली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर